म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५८५

# ओंजळ



REFBK-0025097
REFBK-0025097

अ. के. शेख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ९[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

18 MAR 1987

( क्रु. मा. पहा )
५०००-३-८४

REFBK-0025097



# ओंजळ

कवि

अ. के. शेख

# ओंजळ

कवि
अ. के. शेख
पाडा मोहल्ला,
पनवेल-रायगड

प्रकाशक
विलास जाधव
पनवेल साहित्य संघ
पनवेल, जि. रायगड-४१०२०६

©
सौ. नसिमा अ. शेख

मुद्रक
श्री ज्ञानेश्वर प्रि. प्रेस
पनवेल

मुल्य
वीस रुपये

प्रथम आवृत्ति
१४ मार्च १९८६

मुखपृष्ठ-रेखाचित्रे-सजावट
अरुण कारेकर

कर्मवीर

भाऊराव पाटील

# ओंजळ

तुमच्या चरणी

# ओंजळ


भाऊराव–१
यशवंत–२
स्वातंत्र्यगीत–३
ठेच–४
आई–५
चक्र-६
द्वंव-७
तू म्हणजे–८
आलीस जीवनी–९
तेज सहावेना देही–१०
जगणे-११
इथेच–१२
उध्वस्त–१३
अंतरीच्या व्यथा–१४
मृगजळ–१५
डोळियाच्या डोही–१६
कोंडमारा–१७
गोफ–१८
वर्षागीत–१९
रोपे लावा हो–२०
भाग्य–२१
एकलव्य–२२
जीवन-२३
मनोगत–२४
कालपर्यंत–२५
चांदरात–२६
आकाश–२७
......काय ! –२८
......कुठे असतं !–२९
बांग–३०
आठवण–३१
३२–सांग ना ?
३३–अभिसारिका
३४–मी का म्हणू व्यर्थ
३५–कर्ते-करविते
३६–संकोच
३७–क्षितीज
३८–जनरीत
३९-पाऊस
४०–अंधार
४१–रस्ते आणि रस्ते
४२–उभी रेघ
४३–विरही राधा
४४–उठाठेव
४५–देणारा-घेणारा
४६–त्राता
४७–चांदण्याचा रंग ओला
४८–प्रतिक्षा
४९–कैफीयत
५०–निवृत्ती
५१-रे वसंता
५२–पाऊलवाट
५३-प्रवासी
५४-श्रद्धा
५५-चुका
५६-चिमणा जीव
५७-मुक्ती
५८–न्याय
५९-वेदना
६०-एकटा
६१–भारत जोडो
६२–दूरस्थ
६३-कलंदर
६४-ओंजळ

श्री

आशीर्वाद

श्री ओ. के. शेख ऊर्फ कवी 'सजन' यांनी आपल्या काव्य कुसुमांची सुगंधीत ओंजळ माझ्या ओंजळीत ओतली. आणि मी त्या विविधरंगी फुलांच्या रंगाने, गंधाने मोहित झालो. बराच वेळ माझ्या हातातील ती फुलं होती मी हुंगत होतो. प्रत्येक फूल? - त्याचा रंग वेगळा होता. कोणत्याही फुलाचा गंध उग्र वाटत नाही. विविध प्रकारची फुलं पण सर्वांचा एकमेळ गंध. काही आगळाच वाटला! - तो कसा हे सांगण्यासारखा नाही - त्यासाठी प्रत्यक्ष तो गंध मनापासून चाखायला आहे.

डॉ. बापू के. भाऊराव पाटील

यांनी सातारा येथे स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेत वाढला - शिकला - आणि त्या संस्थेच्या सर्वधर्म समभावनेचा संस्कार घेऊन बाहेर पडला. कर्मवीरांनी सर्व जाती जमातीतील आणि धर्मातील गरीब मुलं शिकविण्यास आणली. त्यांना माय सारखं आपलं

माधुरी मधील धर्म शिकवण. आईबापांचं प्रेम-
मिळतं! जिनवर आईबापानाही प्रेम येत येत
नव्हतं - तो त्यांच्या पुतळ्याला सोबती दिले.
कुमार - बुद्धि मनि पुढच्या शिक्षण
उत्तम शिक्षणासाठी परदेशी पाठवून आपल्या
संस्थेच्या त्यांच्या हातातील गाडी सोडून दिला
त्या संस्थेचं कुसंस्कार घेऊन आलेला
हा परकेपण त्याला पार सतावत आपली
कविता 'त्याची मने पुन्हा वर होता'
भावस्पर्श, रसिकांना आवडणारी
काव्य रचना पाहून थी मारावून गेलो.
आणि हा अनुभव लोकांपुढे आला
नवल रीति. रसिक लोक. आश्चर्य भरून
गेलेले असायचे. त्यामुळे आम्ही त्या
कवीच्या उर्फ आणि उत्साहाने-
काव्य रचना इतर कवीच्या
हातून होत गेली आहे
जे चांगले आहे त्याला चांगले म्हणा-
यलाच पाहिजे - पण इकडच्या जगात
ही त्याला कोणी समजून घेणारी
माणसं आहेत - म्हणून कल्पना रसग्रहणात
इतकं पारखं खरी करून दयावे लागते

त्याहूनही ते सर्व कविता आज -
(शब्द, कल्पना - भावना ते या दृष्टीने)
~~सर~~ सरस उतरल्या आहेत - की
उद्या पुढच्या कवितेमधील. आजच्या
(का) कविता उत्कृष्ट करणं इतर
कवितांतला दर्जा मी कशाकरता
हिंमतीत नाही —

शेवटी इथं माझ्यापेक्षा वयानं
लहानं असलेल्या कवीला. अनेक
आशीर्वाद देऊनं. आणि पुढे
अशी प्रेमाची थाप मारून
अशीच भावरम्य कविता लिहीत
रहा - असं सांगून -
मी इथे थांबतो. इतिहासात नवख्यांना
लाभो. आणि त्याची सुगंधी वाटिका
मनोहर उल्हसित करो

नौपाडा
ठाणे
२९।८४

[signature]

# स्वागत

श्री. ए. के. शेख हे एक तरुण हौशी कवी आहेत. पण त्यांच्या कविता वाचताना जाणवते की काव्यरचना हा त्यांचा केवळ फावल्या वेळेचा छंद नाही तर ती त्यांची जीवनसाधना आहे. कवितेकडे बघण्याची त्यांची दृष्टी गंभीर आहे आणि त्यांच्या कवितालेखनामागे एक संस्कारसंपन्न, ध्येयवादी, समाजाचे काही ऋण मानणारे असे सखोल, चिंतनशील मन आहे. 'ओंजळ' हा आपला पहिलावहिला संग्रह घेऊन विनम्र भावाने पण मोठ्या आशेने ते रसिकांपुढे आले आहेत. कवितेच्या क्षेत्रात अनेक वर्षे वाटचाल करणारी एक साहित्यप्रेमी व्यक्ती या नात्याने मी त्यांच्या कवितेचे मनापासून स्वागत करते.

शेख यांच्या कवितांचे वैशिष्ट्य आणि मर्म समजून घ्यायचे असेल तर प्रथम त्यांच्या जीवनाची पार्श्वभूमी ध्यानात घेतली पाहिजे. बहुजनसमाजासाठी रयत शिक्षण संस्था स्थापन करून ज्यांनी शिक्षणाची, ज्ञानाची गंगा सामान्यांतल्या सामान्य माणसांपर्यंत नेऊन पोहोचवली त्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संस्थेत शेख यांचे शिक्षण झाले. संस्थेत त्यांनी केवळ पुस्तकी विद्या संपादन केली असे नाही तर समाजाच्या उन्नतीची तळमळ, गोरगरीबांविषयी कणव, सर्वधर्मसमभाव, माणुसकी असे अनेक गुणही त्यांनी तिथे आत्मसात केले. विद्यार्थिदशेत शेख यांच्या मनाची या तऱ्हेने जी घडण झाली तिचे पडसाद त्यांच्या कवितेत सर्वत्र उमटलेले दिसतात. कर्मवीरांनी जीवनात आपल्याला जी थोर मूल्ये दिली त्याची शेख यांना कृतज्ञ जाणीव आहे हे त्यांच्या अर्पणपत्रिकेवरून आपल्या ध्यानात येते. आपल्या कवितांची ही ओंजळ कवीने कर्मवीरांच्या चरणी नम्रपणे वाहिली आहे. तसेच संग्रहातली पहिली कविताही त्याने कर्मवीरांना उद्देशूनच लिहिली आहे. कवी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याविषयीची आपली भावना पुढील सुंदर शब्दांत व्यक्त करतो -

प्रेम ही पूजा भक्ती आणिक सेवा हाच धर्म
ज्ञानाचा वटवृक्ष सांगतो द्रष्टेपण अन् मर्म
गाई त्यांची महती कोयना, कृष्णा अन् वारणा
कर्मवीर ते अमर या जगी, अमर त्यांची प्रेरणा!

शेख यांच्या वृत्तीचे हे स्वरूप ध्यानात घेऊनच त्यांच्या कवितांचा आस्वाद रसिकांनी घेतला पाहिजे.

शेरख यांच्या या वैशिष्ट्य वृत्तीमुळे त्यांच्या अनेक कवितांतून सामाजिक जाणीव प्रकट होते. आजच्या समाजातील ढोंग, भ्रष्टाचार, माणसांमाणसांत उभ्या राहिलेल्या भिंती, आर्थिक उच्चनीचतेमुळे समाजाला आलेली विषमता यांची कधी वास्तव तर कधी उपरोधपूर्ण चित्रे शेरख यांनी आपल्या कवितांतून रंगवली आहेत. आजच्या व्यवहारी जगात पैसा, सत्ता, प्रतिष्ठा यांना मोल आले आहे. हे सारे मिळवण्यासाठी माणसे माणुसकी विसरून जिवाचा आटापिटा करीत आहेत हे पाहून कवी म्हणतो —

माणूसपण हरवलेले इथे माणसाचे धर्म
सारे योजले जगाचे खेळ कसली मी दीक्षा?
ठेवायची तरी श्रद्धा आता कुठे आणि कशी?
हैवानाच्या तोंडी सुद्धा इथे आज रामरक्षा!

इंग्रजीमध्ये The Satan citing scripture for his purposes असे एक वचन आहे. सैतान आपल्या स्वार्थासाठी बायबलचाही संदर्भ देतो असा त्याचा अर्थ आहे. शेरख यांनी 'हैवानाच्या तोंडी सुद्धा इथे आज रामरक्षा' असे त्या कल्पनेचे खास भारतीय रूपांतर केले आहे. समाजात माजलेल्या ढोंगावर अनेक ठिकाणी कवी शब्दांचे प्रहार करतो. एका कवितेत तो म्हणतो —

आकाशही वितेनेच मोजणारे तुम्ही
जाऊ द्या हो असा कधी लागतो का ठाव?
इथे कसली किंमत, कसली अपेक्षा?
तुमचाच बाजार हा, तुमचेच भाव!

अशा या सत्तेसाठी हपापलेल्या स्पर्धाशील जगात कवीला अनेक विपरीत दृश्ये दिसतात. सत्ताधीशांपुढे लाचार होऊन गोंडा घोळावा आणि त्याच वेळी आपल्या हाताखाली जे कुणी असतील त्यांना लाथा माराव्यात ही परिस्थिती आज सर्वत्र दिसते. सत्याची पायमल्ली होते. असत्याचा जयजयकार होतो. कालचे वंदनीय कुठारी आज सत्तेच्या सिंहासनापुढे लाचार बनलेले दिसतात आणि अनेकांची अब्रू लिलावात निघते. कुणाही संवेदनाशील माणसाच्या मनाला विषण्ण करील असेच आजचे हे वास्तव आहे. ते बघताना कवीचे हृदय त्वेषाने उचंबळून येते आणि परखड शब्दांत तो म्हणतो —

खांद्यावरी उभे जे आकाशी पोचलेले
येताच स्वर्ग हाती ते हाणतील लाथा!
सत्ताधीशांसमोर शेपूट घालती जे
गल्लीत आपुल्या मग ते मारतील बाता!
दारात आज त्यांच्या जयघोष असत्याचा
फसतील खड्डे ते विसरून राजरस्ता!
जे वंदनीय होते, लाचार आज तेही
अब्रू कुणाकुणाची स्वस्तात विके आता!

या सामाजिक ढोंगावर, विषमतेवर नुसती टीका करणंच कवी थांबला असता तर त्याचे विशेष काही वाटले नसते. पण शेख यांचे वैशिष्ट्यं हे आहे की ते या परिस्थितीचा खोलवर जाऊन विचार करतात. तिची कारणमीमांसा करतात. आणि हे जे काही चालले आहे त्यांत आपण स्वतः देखील काही प्रमाणात भागीदार आहोत हे सत्य मग त्यांना जाणवते. इथे कवीच्या चिंतनशील प्रामाणिक मताची साक्ष पटते. 'एकलव्य' ही शेख यांची कविता या दृष्टीने लक्षणीय आहे. तिच्यामध्ये ते म्हणतात —

आम्ही तुम्ही सगळेच अपंग, विसरुन जगत असतो
पावलोपावली तडजोड करुन दिवस ढकलीत असतो
पापपुण्याचे हिशोब मांडून आयुष्य वेचतो आम्ही
पापा गोडसं नावं देऊन पुण्य विकतो आम्ही
संताप उचवितो शब्दांतून जोड्यांत नसतो अंगार
असते लोकांच्या सहानुभूतीची प्रतीक्षा थंडगार
थाळीत पैसे फेकुन उरकतो सामाजिक कर्तव्य
शब्दांचे पाळीते पाजणारे आम्ही एकलव्य!

शेख यांची ही चिंतनशील अंतर्मुख वृत्ती इतरही कवितांमधून दिसते. 'देणारा-घेणारा' 'काही काही गोष्टी' 'अंधार' या कविता आत जाऊन भिडतात. वाचणाराही त्या अंतर्मुख बनवतात. उदाहरणार्थ, वरील कवितांतल्या या ओवी बघाव्यात —

दारिद्र्याने घेणाऱ्याच्या मोठा होतसे देणारा
नकाराने घेणाऱ्याच्या होतो गरीब देणारा!
दिले-घेतल्याचे कधी पुरे जन्माला पुरते?
होई घेणाऱ्याला ओझे, सुखे मोकळा देणारा! — देणारा-घेणारा.

काही कर्ते असतात काही करविण्यासाठी
रावणारे आम्ही अन् ते राबविण्यासाठी
सगळेच बेत कधी जाऊ नयेत सिध्दीस
काही बेत असतात फक्त ठरविण्यासाठी — काही काही गोष्टी

पापपुण्य खरं म्हणजे
दोन्ही सारखे भाऊ भाऊ
एकमेकांच्या गळ्यात गळे
घालून आता लागतील राहू! — अंधार.

सामाजिक चिंतनपर कवितांच्या जोडीला 'ओंजळ' या संग्रहात दुसरा जो सूर लागलेला आहे तो प्रेमकवितांचा.

हा सूर सच्चा आहे, तकलुपी नाही, किंवा केवळ फॅशन म्हणूनही आलेला नाही हे या कविता वाचताना जाणवते. प्रतीक्षेची हुरहूर, मीलनातले समाधान प्रेयसीच्या अस्तित्वामुळे जीवनाला लाभलेली तृप्ती आणि विशालपण, बकुळीतले छोटे छोटे आनंद या सार्‍यांची हळवी, कोमलवाणी चित्रे या कवितासंग्रहात अनेक आढळतात. ती वाचताना मन प्रसन्न होते. या कवितांची रचनाही साधी आहे. साध्या शब्दांत उत्कट भावना कवीने प्रकट केल्या आहेत. पण म्हणूनच त्या मनाला जाऊन भिडतात. उदाहरणार्थ -

तू गोंजारावे हलके हळवे डाग
तुजला जखमांचे पुसले जावे माग
जाऊच नये म्हणुनी तुजला विनवावे
हलकेच स्वतःला तू सोडवुनी घ्यावे. - सुखदुःख

एक चिमणी घरात आहे
चिमणा जीवही आला आहे
तोही चिमणा झाला आहे
ती चिमणीच्या जिव्याने जगत आहे. - चिमणा जीव

कालपर्यंत हे झाड नव्हतं
असलं तरी एवढं सुंदर नव्हतं
तुला पाहून तेच झाड
चिनार होऊन डोलायला लागलं! - कालपर्यंत

कोसळतो पाऊस हा
ओले हळवेसे मन
आठवणीने कुणाच्या
डोळे आलेत भरून!
कोसळतो कोसळतो
कधी उन्हात पाऊस
तोही खोटाच निघावा
जैसा दिलेला खाऊस! - पाऊस.

शेख यांच्या सर्वच प्रेमकविता चांगल्या आहेत. पण त्यातही 'गोफ' 'पाऊस' 'दिनचर्या' या कविता विशेष लक्षणीय वाटल्या. शब्दांची आतषबाजी न करता साध्या पण नेमक्या आणि

उत्कट शब्दांत या कवितांमधून कवीने आपल्या प्रेमजीवनाचे अनेक कवडसे दाखवून दिले आहेत.

शेख यांच्या कविता वाचताना रचनादृष्ट्याही त्यांचा विचार करावासा वाटतो. मराठी कवितेत अलिकडे गझलरचना फार मोठ्या प्रमाणात होत आहे. सुरेश भट, मंगेश पाडगावकर यांसारख्या नामवंत कवींनी हा रचनाप्रकार कळादृष्ट्या एका विशिष्ट पातळीला नेऊन पोहोचवला आहे. रसिकांतही गझल लोकप्रिय होत आहे. समूहासमोर परिणामकारक रीतीने गझल पेश केली तर त्याला तात्काळ आणि भरपूर दाद मिळते. यामुळे अनेक नवोदित कवी गझलरचनेकडे आकृष्ट झाले आहेत. शेख यांनीही अनेक गझल लिहिलेले आहेत. त्यांतले काही गझल चांगले जमलेले आहेत. अतिशय आकर्षक व ऐकताक्षणी मनाचा वेध घेणारा मुखडा हे गझलचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. त्या दृष्टीने शेख यांच्या काही गझलांचे हे प्रारंभ पाहावेत —

हा तुझ्या नाइयांतला संकोच आहे
मी जसा होतो तसा अन् तोच आहे — मी जसा होतो

उगवत्या सूर्यापुढे वाका म्हणाला
काय अडता गर्दभा काका म्हणाला! — न्याय

भाग्यवंता पुसाति हे ख्याली खुशाली
दुःखितांच्या वेदनांचा कोण वाली! - भाग्य.

का करावे प्रेम जीवापाड मी!
आज या उध्वस्त अन् ओसाड मी! — उध्वस्त

रे वसंता, मी तुला केली मनाई
का फिरंगी यायची केलीस घाई ? - रे वसंता

शेख यांच्या अनेक गझलांच्या रचनाही निर्दोष आहेत. परंतु एकूण गझलरचना हा प्रकार वाटतो तेवढा सोपा नाही. आपल्याकडील वृत्तरचनेप्रमाणेच गझलमध्ये मात्रांचा हिशेब पक्का असावा लागतो. एखादी जरी मात्रा कमी किंवा जास्त झाली तरी गझलचा तोल बिघडतो. आणि जाणकार रसिकाला तो गझल ऐकताना अडखळल्यासारखे, ठेचकाळल्यासारखे होते. शेख यांचे काही गझल या दोषांनी बिघडले आहेत. कुठे-हस्वदीर्घाचा घोटाळा झाला आहे. कुठे एखादी

मात्रा कमी झाली आहे. कुठे जास्त झाली आहे. त्यामुळे वाचताना शब्दांची ओढाताण होते आणि रसभंग झाल्यामुळे वाचक नाराज होतो. शेख यांच्या गझलरचनेमध्ये अनेक ठिकाणी हे दोष आढळले आहेत. त्यांनी गझलच्या आत्म्याप्रमाणे त्यांच्या रचनेकडेही अधिक लक्ष पुरवले तर कालांतराने ते आणखीनही अधिक निर्दोष व सरस गझलरचना करू शकतील.

शेख हे नवोदित कवी आहेत. अशा कवींना शब्दांचा फार सोस असतो. चमत्कार, चटपटीत, स्मार्ट रचना करून वाचकाला दिपवून टाकावे किंवा दुर्बोध, गुंतागुंतीची रचना करून त्याला बुचकळ्यात पाडावे ही बऱ्याच नव्या कवींची कवितालेखनाची पद्धत असते. शेख हे नव्याने कविता लिहीत असले तरी अशाच्या फंदात किंवा मोहात ते सापडलेले नाहीत याचा मला आनंद वाटला. शब्दांचे रंगीबेरंगी फसवे फुगे उडवण्याऐवजी साध्या सुबोध शब्दांत कविता लिहिणे त्यांना कमीपणाचे वाटत नाही. आशय प्रामाणिक असेल, भावना उत्कट असेल तर साध्या सरळ शब्दांतूनही वाचक हेलावून जाऊ शकतो हे तत्त्व शेख यांना फार लौकर कळलेले आहे. म्हणूनच त्यांच्या कवितेत एक आकर्षक साधेपणा, सहजता व सुबोधता आहे. त्यांची कविता समजून घेण्यासाठी शब्दांच्या भुलभुलैय्यात वाचकाला वाट शोधावी लागत नाही किंवा भिन्नभिन्न गुंतागुंतीच्या प्रतिमांत तो पार अडकून पडत नाही. 'साध्याच शब्दांनी कविता बनते । तीस का लागते । यातायाती ।' या एका कवीच्या शब्दांची वारंवार आठवण शेख यांच्या कविता वाचताना होते. मला हे त्यांच्या कवितेचे मोठे कौतुकास्पद वैशिष्ट्य वाटते.

शेख यांच्या कवितेतही प्रतिमा येतात. काही सुंदर उपमाही येतात. पण त्या आकलनास सुलभ आहेत. मुख्य म्हणजे त्या केवळ शोभेसाठी येत नाहीत. तर कवितेचा आशय अधिक अर्थपूर्ण करण्यासाठी येतात. या प्रतिमांची, कल्पनांची अनेक उदाहरणे देता येतील. यांतल्या काहींचा इथे उल्लेख करावासा वाटतो - आठवणींची शहारणारी झाडे, वयात आलेली सांज, चंदन झालेली माती, आठवणींचे रावे, तळहाताच्या रेषांत गुंतलेले भाग्य, कधी चंद्रकोरीची तर कधी चतकोरीची पडणारी स्वप्ने - या प्रतिमांतून आणि कल्पनांतून कवी आपले मनोगत अधिक प्रभावीपणे वाचकांपर्यंत पोहोचवतो.

शेख यांच्या 'ओंजळ' मधल्या कवितांचे स्वरूप हे असे आहे.

या कविता संपूर्णपणे निर्दोष आहेत असे नाही. रचनेतही अनेकदा सैलपणा असल्याचे जाणवते. क्वचित रचनाचा कल्पनेची पुनरुक्ती झालेली दिसते. काही कविता भावगीतांच्या वळणावर गेल्या आहेत. तर 'ओंजळ' या कवितेवर ना. धों. महानोर यांच्या रचना-पद्धतीची छाप पडलेली आहे. परंतु कुठल्याही कवितासंग्रहाचे मूल्यमापन करायचे असते ते त्यातल्या दोषांवरून नव्हे तर गुणांवरून. आणि असे गुण 'ओंजळ' या कवितासंग्रहात पुष्कळ आहेत. त्यामुळे काव्यक्षेत्रात शेख यांना उज्ज्वल भवितव्य आहे असे म्हणण्यास मला काही हरकत वाटत नाही. या कवीचा यापुढचा काव्यप्रवास निर्वेधपणे आणि प्रगतीच्या दिशेने होवो अशी सदिच्छा मी इथे व्यक्त करते

पुणे. दि. १२-२-८६.

शैलजा राजे

# ऋणनिर्देश

"ओंजळ" ही माझी पहिलीवहिली साहित्य कलाकृती आपल्या हाती देताना मन भरून आलयं. कृतज्ञतेने डोळे पाणावलेत. असंख्य चाहत्यांच्या कौतुकानंच हा काव्यसंग्रह प्रकाशीत करण्याचं बळ मिळालं नि हा काव्यसंग्रह आज मोठ्या दिमाखानं, अभिमानानं, विश्वासानं रसिकांच्या दरबारात सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. आपल्या लाडक्या मुलीची सासरी पाठवणी करणाऱ्या प्रेमळ पित्याच्याच आज माझ्या भावना आहेत. म्हणूनच कृतकृत्य झाल्याच्या समाधानाने डोळे पाणावलेत.

हा काव्यसंग्रह प्रकाशित करताना अनेक मित्रांचे-सहकाऱ्यांचे हात माझ्या हाताला लागले. तसेच वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद ही लाभले. वडिलधाऱ्यांच्या या आशीर्वादात कविश्रेष्ठ पी. सावळाराम, सुप्रसिध्द कवियत्री शांता शेळके, लोकप्रीय नि लाडके साहित्यीक मधु मंगेश कर्णिक, नाटककार विजय मोंडकर, साहित्यीक रमण माळवदे जेष्ठ पत्रकार चंद्रशेखर वाघ, संजिवनी खेर, प. र. हेंद्रे, गुरूवर्य ब. वा. काळे यांचा नामनिर्देश आवर्जून करावा लागेल.

खास अुल्लेख करावा असे अनेक मित्र आहेत. सुवर्ण पारितोषिक विजेते कवि परेन जांभळे, बबन काळे, मालती माने, प्रभाकर पंडीत, महेश केळुसकर, चित्रा गद्रे, शामराव शेंडे, अनुजा देशपांडे, सुहासिनी मुळगावकर यांचा अुल्लेख करावा लागेल. आकाशवाणी, दूरदर्शन या माध्यमातून जास्तीतजास्त रसिकांपर्यन्त पोचविण्याचे श्रेय केवळ त्यांचेच!

लोकप्रिय गझल गायक दत्ताजी जाधव, अजीत जोशी, अरूण कारेकर, अशोकराज पाटील आणि त्यांच्या शालिमार सरगम वाद्यवृंदातील सहकारी, एल्. एम्. चौधरी यांनी माझ्या कवितांना संगीत-साज चढवून त्यांचं रूप अधिक खुलविलं.

मुंबई दूरदर्शन केन्द्र, मुंबई व रत्नागिरी आकाशवाणी केन्द्र, तसेच लोकसत्ता, अुत्सव, नवी मुंबई, दाक्षिण युग, त्रिदल, आकाशगंगा, चौखांबा, जीद्द इत्यादि दिवाळी अंक, लोकप्रभा, कर्नाळा, श्री विद्या, किल्ले रायगड, झुंज वगैरे साप्ताहीके आणि राष्ट्रतेज, प्रभात, सांजसमाचार इत्यादि दैनिकांनी माझ्या अनेक कवितांना प्रसिध्दी देअून रसिकांसमोर आणले.

रयत शिक्षण संस्थेचे कार्यवाह डॉ. विलासराव घाटे, प्रा. एम्. ए. शेख, प्रा. मुल्ला, प्रा. लोहकरे प्रा. अरविन्द मोरे, सरोदे सर, अरूण बोत्रे, बबन खराडे यांचे सहकार्य नेहमीच लाभले.

रायगडमधल्या माझ्या पोस्टांतील बंधु-भागिनींनी दिलेलं अलोट प्रेमही लिहायला सहाय्यभूत ठरलं, नाहीतर पोस्टासारख्या रूक्ष खात्यांत हा कवितांचा मळा फुलताच ना! के. एन्. करवाडे, एन्. पी. भोईर, बी. एन्. चव्हाण, राजा ठाकूर, सुरेश सराफ, कृष्णा पाटील, जयवं पाटील, बी. एन्. जाधव, मधुकर तुनतुणे, संजय माने, एम्. बी. हरिकुंभारे, बबन पेणकर, छाया मांदरे, सुनिता म्हात्रे, एस्. एन्. पाटील, अे. डी. पाटील, अशोक पाटील, अे. बी. बाजारे, एम्. पी. आठवले, वामन साखरे, डी. जी. पेंडसे, आवारे, किल्के इत्यादि सहकारी, तसेच वाडारकर साहेब देवसाहेब यांच्यासारख्या अधिकारीवर्गाचाही मी ऋणी आहे. संघटनेचे नेते डी. डी. शिंदे, पी. के. पेंडसे, पी. एन्. सालम, एम्. जी. माणगावकर, पी. टी. बर्गे चाळके बंधु वगैरेंनी तर महाराष्ट्रभर माझं नाव पोहोचविलं—कवि म्हणून!

पनवेल आणि उरणच्या रसिकांचं तर मान्य केलंच पाहिजे. ठिकठिकाणी प्रसिध्द झालेल्या कवितांवर वेळोवेळी अभिप्रायाचा- कौतुकाचा पाऊस पाडला तो यांनीच! चिंतामण

ठपाध्ये, शरद कोचूरे, बसंत जोशी, नारायण लाळे, अरविंद जोशी, एल. बी. पाटील, गोविंद प्रभूदेसाई, दिलीप धावत्रे, गजानन कुंभार व त्यांचे कुटूंबीय म्हणजे माझ्या कवितेचे पहिले श्रोते. आप्पासाहेब मालुसरे, विलास सुर्वे, डॉ. दवे, विष्णू मोरे, नारायण चितळे, आझिम पटेल, युसूफ मुल्ला, विवेक सोहनी, अरूण घरत, अमोल साखरे यांचे मौलिक सहकार्य नेहमीच लाभले. काही लिहावसं वाटायचं ते त्यांच्याकडून मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळेच. पनवेल साहित्य संघ आणि उरण तालुका मराठी साहित्य संघ यांनी माझ्याबरोबरच माझी कविताही लोकप्रिय केली.

उरणचे नगराध्यक्ष नूर मुल्ला, दत्ता रहाळकर, चंद्रकांत तेरडे, संजय तेरडे, शफी नवरंगे, शिलोत्री हेमंत चव्हाण, उमेश प्रधान, एन्. जी. म्हात्रे, विभावरी पांडगावकर, सुमन घाटे, वासंती ठाकूर, महिला मंडळ आणि नगराजशेठ यांच्या सहकार्याबद्दल मी ऋणी आहे.

तसं पाहिलं तर माझ्या कविता माझ्यापुरत्याच मर्यादित होत्या. त्या लोकांसमोर आणण्याचे काम किंबहुना मला कवि म्हणून उभं करण्याचं काम पनवेल साहित्य संघाचे कार्यवाह विलास जाधव यांनी केलं. माझे परमस्नेही वसंत ठाकूर यांनी माझ्या कवितांचं संकलन व मांडणी केली. कविसंमेलनात भाग घ्यायला लावणं, कवितांचे रेकॉर्डींग करणं हे आपुलकीनं करणारं एक व्यक्तिमत्व त्याच्या रूपानं मला लाभलं. एक चाहता, जाणकार रासिक, कठोर सामिक्षक, हितचिंतक अशा आणखी किती नि कसल्या नात्यानी आम्ही बांधलो गेलो आहोत, कुणास ठाऊक! पण हा मी उभा राहीलोय तो त्यांच्यामुळेच!!

मनावर झालेल्या संस्कारात गावचा-पारगावचा, तसेच सभोवतालच्या केडगाव, वरवंड, यवत आदी गावांचा व पुण्याचा जसा वाटा आहे तसाच माझ्या शिक्षक भगिनी सौ. सुलभा फडके (पुर्वाश्रमीच्या मालती नाईक) यांचाही वाटा आहे. मराठमोळे संस्कार जे मनावर घडले-बिंबले व वाचनाची आवड लागली ती केवळ यांची कृपा! महाविद्यालयांत काव्याकडे अधिक आकर्षित झालो ते प्रा. डॉ. आनंद यादव यांच्यामुळेच!

काही ऋणांच्यात रहाणंच अधिक सुखद असतं. घरातल्या माणसांबद्दल काय बोलावं? घरातलं वातावरण प्रसन्न ठेवण्यासाठी धडपडणारी, माझा मूड जपणारी, भावना-मूड जपणारी ही माणसं म्हणजे माझी दैवतं! आई, वडील, भाऊ, बहिणी, पत्नी आणि मुलंही. मला सहन करताना कधी कमी पडली नाहीत. आईच्याच गुणगुणण्यातून स्वरांचं ज्ञान मला मिळालं. माझ्या कवितांना मी चाल लावून सादर करतो, त्याचे श्रेय आईचेचं!

वंदनिय कवियत्री शांता शेळके, यांनी ओंजळला प्रस्तावना देऊन, आदरणीय कविश्रेष्ठ पी. सावळा-राम यांनी आशिर्वाद देऊन, प्रसिध्द साहित्यीक मधु मंगेश कर्णिक यांनी कौतुकाचे दोन शब्द लिहून "ओंजळ"ला सौभाग्याचं लेणं चढवलयं. माझे परमस्नेही अरूण कारेकर यांनी नुसतं मुद्रकाचं काम केलं नाही तर अतिशय आकर्षक मुखपृष्ठ नि बोलकी रेखाचित्रें काढून आपल्या कलेचं सुवर्ण या संग्रहावर चढवलंय. त्यांचे आभार मानायचे कसे आणि किती! अत्यंत अल्पावधीत कारेकरांनी सुबक छपाई व आकर्षक मांडणी करून दिली. त्यांना व त्यांच्या 'ज्ञानेश्वर प्रेस' मधील सहकाऱ्यांस धन्यवाद!

अशाच नामीक-अनामिकांच्या आधारानं भूईचा वेल मांडवाला लागलायं, नि या वेलीची फुलें रसिकांना अर्पण करीत आहे. यातील काही फुलें नाजूक असतील तर काही हळवी, काही वासाची असतील तर काही शोभेची, काही नर्म असतील तर काही बटबटीत. पण मोहक मात्र सारीच आहेत. कुणी एखादं घ्यावं तर कुणी ओंजळ भरून! कुणी गीत म्हणून घ्यावं तर कुणी कविता म्हणून!! पण निखळ भावनाविष्कार व्यक्त केलेल्या फुलांची 'ओंजळ' काव्यप्रेमी रसिकांना निश्चितच आवडेल असे माझे मत आहे. रसिकांनी ही सेवा रूजू करून घ्यावी ही नम्र विनंती.

पनवेल १४ मार्च १९८६.

— ए. के. शेख.



# कर्मवीर भाऊराव पाटील

महाराष्ट्राचे उन्नत मस्तक, नत ज्यांच्या धोरणा ।
कर्मवीर ते अमर या जगी, अमर त्यांची प्रेरणा ।। धृ ।।

अज्ञानाच्या शृंखलातूनी मुक्त, स्वप्न ज्यांचे ।
समतेवर आधारित सुजाण, ज्ञानी समाजाचे ।
बहुजन समाज साक्षर व्हावा, ही ज्यांची धारणा ।
कर्मवीर ते अमर या जगी, अमर त्यांची प्रेरणा ।। १ ।।

त्याग, कष्ट, सेवा ही शस्त्रे, जबरदस्त विश्वास ।
स्वावलंबन, सत्यप्रियता, स्वातंत्र्याचा ध्यास ।
चंदनापरी देह झिजविला, समाजहित कारणा ।
कर्मवीर ते अमर या जगी, अमर त्यांची प्रेरणा ।। २ ।।

रयत शिक्षण संस्थेची गंगोत्री अवतरली ।
ज्ञानगंगा गरीबांच्या दाराशी पोहोचविली ।
कृतज्ञ आम्ही, विसरू कसे, त्या अलोट प्रेमा-ऋणा ।
कर्मवीर ते अमर या जगी, अमर त्यांची प्रेरणा ।। ३ ।।

प्रेम ही पूजा-भक्ति आणिक, सेवा हाच धर्म ।
ज्ञानाचा वटवृक्ष सांगतो, द्रष्टेपण अन् मर्म ।
गाई त्यांची महती कोयना, कृष्णा अन् वारणा ।
कर्मवीर ते अमर या जगी, अमर त्यांची प्रेरणा ।। ४ ।।



# यशवंत

यशवंत, जयवंत, कीर्ति ही तुझी दिगंत ।
नेता तू लाडका अन् वृत्तीनेही संत......॥ धृ ॥

हिमगिरीस रक्षण्यास सह्याद्री होई पुढे ।
जिकडे पदस्पर्श तुझा वाजतात चौघडे ।
होता तुझिया रूपात राजकारणी वसंत ।
नेता तू लाडका अन् वृत्तीनेही संत......॥ १ ॥

साहित्यीक तू, विशाल हृदय तुझे अमृतजल ।
गरिबांच्या दु:खाला सतत तुझे नयन सजल ।
सागर माणुसकीचा सहृदयी तू नामवंत ।
नेता तू लाडका अन् वृत्तीनेही संत......॥ २ ॥

झाले बहु होतीलही, तुजसम जगी तूच एक ।
आठवणी आज तुझ्या, कथिती संस्था अनेक ।
शांत, विचारी, संयमी, क्रांतीविर, कृपावंत
नेता तु लाडका अन् वृत्तीनेही संत......॥ ३ ॥

आश्वासक हात तुझा होता महाराष्ट्रावर ।
'साहेब' तू सर्वांचा पण सेवेला तत्पर ।
कर्तृत्व अनंत तुझे, भरूनी राहशी अनंत
नेता तू लाडका अन् वृत्तीनेही संत......॥ ४ ॥

रसिकाग्रणी शिल्पकार महाराष्ट्राचा महान ।
विसरणार नाही तुला कुणीही, मातीची आण ।
सह्याद्री पोरका तुझ्याविणा, हिच खंत ।
नेता तू लाडका अन् वृत्तीनेही संत......॥ ५ ॥



# स्वातंत्र्य गीत

ज्यांनी भारत स्वतंत्र केला, ठेवा त्यांची स्मृती,
त्या सर्वांना प्रणाम करूनी, गाऊ या आरती...।।धृ।।

'स्वराज्य माझा हक्कच आहे', लोकमान्य गर्जले,
'भारत छोडो' शब्द निग्रही, गांधीजी बोलले,
नेत्यामागून अगणित नेते, स्वातंत्र्या लाभती,
त्या सर्वांना प्रणाम करूनी, गाऊ या आरती...।।१।।

ध्येयासाठी रक्त सांडिले, नव्हती त्यांना क्षिती,
त्या थेंबाथेंबातच रूजले, असे हुतात्मे किती,
सर्वस्वाचा होम करूनी, जे अमरत्वा प्राप्तती,
त्या सर्वांना प्रणाम करूनी, गाऊ या आरती...।।२।।

प्राणपणाने मिळविले जे, प्राणपणाने जपा,
अनेकातूनी एकात्मता, वाढविण्यास्तव खपा,
आशीर्वच बोलती 'सुखाने, राहो ही भारती',
त्या सर्वांना प्रणाम करूनी, गाऊ या आरती...।।३।।



# ठेंच

उंबरठ्यावरतीच लागली, जगताच्या जर ठेच,
जगताना पडतील बापहो, किती किती हे पेच..... ॥ धृ ॥

इन्द्रधनुच्या रंग सप्तमी, कुणास तू त्यजणार,
सप्तसूरांच्या सुरावटीतून, कुणा वर्ज्य करणार,
फुलें अंथरू नकोस मार्गी, काटे तरी तू वेच......॥ १ ॥

समाजपुरुषा तुझे वागणे, असू दे रे निर्वेध,
हा अपुला अन् तो परका, हा असू नये रे भेद,
माणूस म्हणूनी जगण्यासाठी, किती ही रस्सीखेच......॥ २ ॥

पुसावेस तू अश्रु, देऊनी धीर, लाव हृदयास,
मानवतेचे विश्व आगळे, येऊ दे उदयास,
हाताला दे हात, सांगणे, आता तरी इतुकेच......॥ ३ ॥



# आई...

मज जन्मास येण्याची,
झाली नव्हती मुळी घाई ।
होतो उबेत खेळत,
बागडत तुझ्या देही ।।

नऊ महिन्यांत माझा,
आला का कंटाळा तूला ।
नव्हती पहाण्याची इच्छा,
जग दाखविले मला ।।

जगाकडे पहाताना.
डोळे माझे दिपतात ।
ऐकऐकता जगाचे,
लाख सुया बोचतात ।।

जगण्याची वाट जाते,
मरणाच्या टोकाकडे ।
इथे सारे पाप चाले,
डोळे मात्र मोक्षाकडे

नाही पचनी पडत,
इथे जगाची ही रित ।
नको पाहू माझा अंत,
मला पुन्हा घे पोटात ।।




ओढून पाय मागे, जाती पुढे करंटे,
हे चक्र माणसा का, विसरून जात नाही.

कोणी वहात असतो, चिंता अशा फुकाच्या,
शेजारच्या घराचा, उंबरा पहात नाही.

वरती पहात कोणी, देई कुणास दोष,
पुसण्या ललाटरेषा, बळ का करात नाही.

जिव्हा मुकी बिचारी, बोलविता धनी तूच,
जे शस्त्र धारदार, जपण्या पहात नाही.

जे भाग्य तुज मिळाले, उपभोगीशी सुखाने,
जे राहिले खाली, त्या, वळूनी पहात नाही.



# दंव

नाजूक हळवे दंव पडावे,
ओळख सहजी झाली ती ।
हळूच कळी ती ये आकारा,
फुलली मोहरली नाती ॥

कळ्या-फुलांच्या ओठावरले,
टिपले फुलणारे संगीत ।
मनातल्या हळूवार भावना,
विणती नक्षत्रांचे गीत ॥

प्राजक्ताचा गंध सभोती,
रंग गुलाबी ठसवावा ।
या घडीचा हिरवा पाचू
जीवन कोंदणी बसवावा ॥

प्रवास हा सारा संपावा,
इथेच आणिक तुझ्या कुशीत ।
प्रारब्धाची नको परिक्षा,
प्राणही जावा खुषीखुषीत ॥



# तू म्हणजे

तू म्हणजे स्वप्न आहेस, उजाडण्यापूर्वी पडलेलं,
तू म्हणजे लक्ष आहेस हृदयात दडलेलं.

तू म्हणजे कविता आहेस, निसर्गावर केलेली.
तू म्हणजे संध्या आहेस, गुलाबी झालेली.

तू म्हणजे बाग आहेस, वसंतात बहरलेली,
तू म्हणजे वेल आहेस, फुलांनी डवरलेली.

तू म्हणजे प्रीत आहेस, मोगऱ्याने मोहरलेली,
तू म्हणजे जनरित आहेस, काटयाकुटयांनी भरलेली.

तू म्हणजे भक्ति आहेस, भावफुलांनी पुजलेली.
तू म्हणजे शक्ति आहेस, व्यवहारानी तोललेली.

तु म्हणजे गीत आहेस, दो ओठांनी गायीलेले,
तू म्हणजे स्मित आहेस, जळत्या जखमांवर फुललेले.

तू म्हणजे फूल आहेस, सुगंधाने नटलेलं,
तू म्हणजे कोडं आहेस, सुटलेलं-न सुटलेलं.



# आलीस जीवनी

आलीस जीवनी,
उधळीत सुमनें,
हास्याची.........
अन् सुगंधी झालो ।

आलीस जीवनी,
झुलवित चवरी.
मायेची.........
अन् कृतार्थ झालो ।

आलीस जीवनी,
फेकित अस्त्रे,
मोहाची.........
अन् मोहूनी गेलो ।

आलीस जीवनी,
छेडीत वीणा,
प्रीतीची ........
अन् भरून पावलो ।

आलीस जीवनी,
फुलवित गुलाब,
लज्जेचा.........
अन् मनीं मोहरलो ।

आलीस जीवनी,
शमवित तृष्णा,
जगण्याची......
अन् शांत जहालो ।





# तेज साहवेना देही

तीच नेहमीची सांज, जरा अवेळी आलेली
तीच कातरशी वेळ, वेळ अवेळ झालेली

तीच नेहमीची जागा, आज नको वाटणारी
तोच वेल कसलासा, मलणारा पाठीवरी

गर्दितला एकांत तो, तोच गंधहीन वारा
चित्र-विचित्र तो सूर, सारे व्यर्थ वाटणारा

सर्व तेच तेच मग, नकळत ओढ ही का
नक्षत्रांचे आकाश नि चंद्रही का वाटे फिका ?

आज विरहाचे लेणे, ल्यालेलो मी ल्यालीतूहि
तुझ्यावीण चांदण्याचे, तेज साहवेना देही



# जगणे

जगणे खुशाल माझे. मन हारले तरीही,
मरणे पदोपदी ये. जन तारले तरीही.

नाती सुखासुखाची, नाती अटीतटीची,
माझी मलाच नडली, मी जोडीली तरीही.

स्वार्थी जगा तूला रे, काही अशक्य नाही,
पुसलीस रेघ, होती दगडावरी तरीही.

ही दुर्दशा जिण्याची, लेणे तुझे कपाळी,
कृतज्ञ भाव माझा, मी सांगतो तरीही.

डोळ्यांत आसवांची, ही माळ वाट पाहे,
हे भाग्य कुणा भेटे, हरलो असा जरीही.




इथेच सजविती कुणी,
लक्ष्मीसाठी दप्तरें ।
इथेच त्या लक्ष्मीधरा,
लाजविती लक्तरें ।।

इथेच राहती ससे,
इथेच शौर्य नांदते ।
इथेच कर्ण जन्मती,
इथेच क्रौर्य सांडते ।।

इथेच प्राशिती कुणी,
दारिद्र्याचे रडे ।
इथेच पाजिते कुणी,
उपेक्षांचे धडे ।।

इथेच बहर शब्द-फुलां,
इथेच गंध मातीला ।
इथेच कर्ण शापीला,
इथेच स्वार्थ सजविला ।।




का करावे प्रेम जीवापाड मी ।
आजचा उध्वस्त अन् ओसाड मी ।।

थोडकी का पाहिली स्थित्यंतरे ।
संशयाच्या वादळातील झाड मी ।।

कोळपली काळजाची स्पंदनें ।
का करावे भावनांचे लाड मो ।।

जे मिळाले, ते मिळाले, ना मिळाले ।
का धरावी मृगजळाची चाड मी ।।

काय नसती तीक्ष्ण कांटे केवड्याला ।
स्पृश्य बाजारी जगाच्या द्वाड मी ।।

# अंतरीच्या



# व्यथा

हासतानाही कधी, अश्रु असे ढळतील ना,
अंतरीच्या या व्यथा, ना सांगता कळतील ना ।

ईश्वरी देण्यातले नाकारता, येते कुठे ?
सुख-समृद्धी नसो पण, शाप ते टळतील ना ।

श्वास तू निःश्वास तू, चैतन्य तू आनंद तू,
भक्त मी शंका तुझ्या, आतातरी जळतील ना ।

मोह माया 'मीपणाची', खोवलेली ही पिसे,
अंतीच्या वळणावरी, सारी पिसे गळतील ना ।

यायचे आहे पुन्हा, हा मी निघालो यायला,
पावले माझी शहाणी, शेवटी वळतील ना ।



# मृगजळ

टेकलो जेथे तोही वारा निघाला ।
थांबणे नाही पहा तारा निघाला ॥

मी मुकाटयाचीच धरली कास ती ।
बोललो जेव्हा मात्र वारा निघाला ॥

कळवळा ओठांत तुमच्या तो दिखावू ।
सोनियाचा गोजिरा पिंजरा निघाला ॥

जे असे त्याचीच केली वर्णने मी ।
न्याहळू चेहरे नका पारा निघाला ॥

हौस माझी, हास्य जगता वाटण्याची ।
गाळला अश्रु कसा खारा निघाला ॥

सोसले मी घाव हे अन् ते तसेही ।
ओळखीचा, दुःख हे, चेहरा निघाला ॥



# डोळीयांच्या डोही

निळ्या डोळियांत तुझ्या,
अवघी आकाशाची काया ॥
निळ्या डोळियांच्या डोही,
साऱ्या सागराची माया ॥

निळ्या डोळियांत तुझ्या
अवघी सृष्टी विसावली ।
निळ्या डोळियांच्या डोही,
माझी तहान भागली ॥

निळ्या डोळियांत तुझ्या,
प्रीती देवतेचे घर ।
निळ्या डोळियांच्या डोही.
त्याचे उघडते दार ॥

निळ्या डोळियांत तुझ्या,
अशी उमलली जाग ।
निळ्या डोळियांच्या डोही,
मला सापडला माग ॥

# कोंडमारा



कोंडमारा भावनांचा तू दिलेले दान हे,
कर्दळी आयुष्य माझे करपले तू जाण हे......।। धृ ।।

मांडला संसार होता वेचूनी काटेकुटे
तोलणारा हात देई फेकूनी वाटे कुठे
चालणे आता दिशाहिन, हरपलेले भान हे
कर्दळी आयुष्य माझे करपले तू जाण हे......।। १ ।।

सोनियाचे दिवस होते दैव होते भाळले
मानसन्मानात होते विश्व जे तेजाळले
दाटला काळोख, कंठी आज आले प्राण हे
कर्दळी आयुष्य माझे करपले तू जाण हे......।। २ ।।

कायदे-रिती-रिवाजातून गळले काय ते
श्रांत मी, नाही कुणाचे फक्त धरले पाय ते
मी मुकी आहे उभी अन् पेटलेले रान हे
कर्दळी आयुष्य माझे करपले तू जाण हे......।। ३ ।।

एक तू आधार होता, मित्र होता, सर्व तू
का सुरू केले अचानक आसवांचे पर्व तू
की तुझ्या माझ्यात अडते प्राक्तनाचे पान हे
कर्दळी आयुष्य माझे करपले तू जाण हे......।। ४ ।।



# गोफ

उरल्या सुरल्या,
प्रीतीतून मी,
अर्थ काढला ।।

आठवणीच्या,
धाग्यातून मी,
गोफ गुंफिला ।।

हलक्या-फुलक्या,
हाताने तू,
तो कुस्करला ।।

पुढच्या जन्मासाठी,
येईन मी,
जन्माला ।।




आला पाऊस आला वारा,
रिमझिमती या रेशिम धारा ।
कशा कुठूनशा येती आणिक,
भिजवून जाती परिसर सारा ॥

ओलेत्यातून गंध गोडसा,
मळलेल्या मातीतून यावा ।
धरतीच्या अंगावर हिरवा,
शालू ऐसा खुलूनी जावा ॥

सरळ अशा सोनेरी रेघा,
खुणावती त्या हळूच मलाही ।
खेळण्यास हा मित्र लाभला,
आता आनंदा तोटा नाही ॥

जिकडे तिकडे पाणीच पाणी,
असे दिसे का कुठे कोरडे ।
पाहुनी बैसे चिवूताई ती,
जगण्याचे अन् सुटले कोडे ॥




रोपे लावा हो, रोपे लावा हो ।
रोपे लावा हो, रोपे लावा हो ।
हरित क्रांतीच्या चळवळीला द्या ओलावा हो ॥ धृ ॥

आजची रोपे वृक्ष उद्याचे जातील गगनांतरी ।
आकाशीच्या जलधारांना आणतील धरणीवरी ।
भूमातेला मखमलीने हिरव्या, नटवा हो ॥ १ ॥

फळझाडांची, फुलझाडांची रोपे अगणीत किती ।
सुमधूर देती फळे आनंदे, सुवासही निर्मिती ।
वायू प्रदूषण संकट मोठे क्षणांत हटवा हो ॥ २ ॥

गाईगुरांना चारा, आसरा, पांथस्था सावली ।
उजाड राना देई शोभा निसर्ग नियमावली ।
जगा, जगू द्या, त्या रोपांना तुम्ही जगवा हो ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)




भाग्यवंता पुसती हे ख्याली खुशाली ।
दुःखितांच्या वेदनांचा कोण वाली ? ॥

काय पुसतील अश्रु हे वारे मुजोर ।
पेटवा अश्रूच आता वेळ झाली ॥

दांभिकांच्या बंद या बाजारपेठा ।
शेकडो रेंगाळती येथे सवाली ! ॥

प्रकाशानेही हिशोबी का राहावे ।
काय केला सूर्यही यांच्या हवाली ? ॥

रूक्ष सुकल्या अंबराला काय पुसता ।
आलो घेऊन मीच माझे भाग्य खाली ॥

# एकलव्य



विसरून सगळं जायचं असतं, घडलंय जे जे कालं ।
ताज्या रक्ताचाही कधी, नसतो रंग लाल ।।

आम्ही-तुम्ही सगळेच अपंग, विसरून जगत असतो ।
पावलोपावली तडजोड करून, दिवस ढकलीत असतो ।।

आमच्या अंगच्या धगीने, कोमेजतात प्राजक्त ।
उसळणारं गंध-वास, रंग हरवतं रक्त ।।

पाप-पुण्याचे हिशोब मांडून, आयुष्य बेततो आम्ही ।
पापा गोंडस नाव देऊन, पुण्य विकतो आम्ही ।।

संताप उबवितो शब्दातून, डोळ्यांत नसतो अंगार ।
असते लोकांच्या सहानुभूतिची, प्रतिक्षा थंडगार ।।

थाळीत पैसे फेकून, उरकतो सामाजिक कर्तव्य ।
शब्दांचे पलिते पाजळणारे, आम्ही एकलव्य ।।



# जीवन

का जिण्याची शान जावी,
नेसता मी लक्तरे ।
प्रिय मजला घाम माझा,
ना सुगंधीत अत्तरें ॥

हासतां फुलें पडावी,
भाग्य माझे ना असे ।
पाहतो परि कल्पनेने,
चांदव्यांवरले ससे ॥

भूक माझी भावनेची,
मी ती पुरवू कुठवरी ।
आज बाजारात आली,
का विकाया कस्तुरी ॥

उगवणारा सूर्यसुद्धा,
राही यांच्या वस्तीला ।
संपणारा ना कधी,
काळोख यांच्या मस्तीला ॥



# मनोगत

तू पहाट समयी होऊनी यावा समिर
दर्शने तुझ्या हलकेच सरावा तिमिर,
पाकळ्या फुलांच्या अलगद फुलता फुलता,
उडवावा गंध हातानी निद्रा भ्रमर.

ही सभोवारची हरित तृणांची पाती,
टपटपता थेंब ही झाली चंदन माती,
तू दवबिंदूच्या डोळ्यांनी निरखावे,
पाहता निरखणे लाजून चूर मी व्हावे.

सुस्नात कोवळे यौवन मुसमुसणारे,
हे केस रेशमी, स्पर्शा आसुसणारे,
सुकविता केस, शून्यात खिळावी दृष्टी,
नजरेतून व्हावी फुलाफुलांची वृष्टी.

या निवांत वेळी ऊन वेचता पदर जळे,
भरल्या नयनामधूनी अश्रूंचे गीत गळे,
वाटते रिते व्हावेच तुला सांगून परि,
ही अनाहूत कल्पना मनाला कळे ना कळे.

या सायंकाळी उदास येती सूर,
चालता दाटतो मनांत भावूक पूर,
मग हळूच कधि हातात हात गुंफावा,
अन् बहरून यावा अवघा चाफा हिरवा.

ही आतूर घटका मीलनाची मीलनाची,
देहातील मिटल्या कळ्या कळ्या फुलण्याची,
तू मला–मी तूला सांगत सजवायाची,
ही रात्र अशी रे डोळ्यांनी प्यायाची.

मग तृप्त मनाने कधी मिटावे डोळे,
हलकेच ढळावे चंद्रबिंब वाटोळे,
स्वप्नांत कधी मग समुद्रपक्षी यावा,
या कणाकणांतील अमृत पिऊन जावा.



# कालपर्यंत

कालपर्यंत मी कोणी नव्हतो
माझ्याकडे कोणी पहात नव्हते
तू माझ्याकडे पाहिलंस आणि
सारं जग पहायला लागलं.

कालपर्यंत हे उन नव्हतं
असलं तरीही ते जाणवत नव्हतं
तू आलीस आणि ते ऊन
चांदणं व्हायला लागलं.

कालपर्यंत हे वारे नव्हते
असले तरी ते सुगंधी नव्हते
तुझ्या येण्याने तेच्च वारे
सुगंध वहायला लागले.

कालपर्यंत हे झाड नव्हतं
असलं तरी एवढं सुंदर नव्हतं
तुला पाहून तेच झाड
चिनार होऊन डोलायला लागलं

कालपर्यंत अवघं जग
डोळ्यात कधी भरलं नव्हतं
सुकलं फूल फुलवायला सखे,
हृदयाशी धरायला लागतं.




रूपेरी चांदण्यांत आज रात न्हालेली ।
सखे, वयात अशी चांद रात आलेली...॥ धृ ॥

फुलास हट्ट फक्त फुलण्याचा,
खुलवूनी स्वत:ही खुलण्याचा,
सुगंधी जाग फुलात आलेली,
सखे, वयात अशी चांद रात आलेली...॥ १ ॥

विडयास मोह तुझ्या ओठाचा,
मुलायम स्पर्श तुझ्या बोटाचा.
रंगारंगाने लाज आलेली,
सखे, वयात अशी चांद रात आलेली...॥ २ ॥

सुगंधी श्वास अन् उसासेही,
मधे नवे गुलाबी किस्सेही,
दिव्याची मंद वात झालेली,
सखे, वयात अशी चांद रात आलेली...॥ ३ ॥

मिठीत गच्च धुंद ओलावा,
मुक्याने शब्द शब्द बोलावा,
हरेल त्याची जीत झालेली.
सखे, वयात अशी चांद रात आलेली...॥ ४ ॥

# आकाश



तुझ्या निळ्या डोळ्यातले आकाश
जेव्हा माझ्या मनाच्या
क्षितिजावर विसावते
तेव्हा वातावरण कुंद होतं–
धुंद होतं,
जीव हरखून जातो
अवघी धरणी आनंदीत होते.
दुःखाच्या पाऊलवाटा बुजतात.
आठवणीची झाडे पालवतात.
सुखाचे 'दिवे' चमकू लागतात.
आकांक्षांची पाखरें उडतात.
पण,
जेव्हा या आकाशातून
पाण्याच्या धारा स्रवू लागतात
तेव्हा मात्र धरणी
कासाविस होते
अवघे आकाश कोसळल्यासारखे वाटते.
मन क्षितिजापार जातं.
नि जीवाचं पाखरू
प्रीतीच्या पाऊलवाटेत
चाचपडू लागतं ......



## .....काय ?

सबळांच्या सुखात सारं आभाळ बुडेल काय ?
दुर्बळांचं दुःखाशिवाय, काही नडेल काय ?

शब्दांनी ओचकारून बोचकारून झालं,
डोळ्यातलं पाणी आता कुठ अडेल काय ?

अनोळखी होतात जेव्हा परिचित चेहरे,
स्वतःचाच परिचय नव्याने घडेल काय ?

कोऱ्या ब्लेडवर जेव्हा घासून येतात शब्द,
अशा जवळच्या माणसांवर प्रीति जडेल काय ?

थकलेली दुःखं जेव्हा वस्तीला येतात,
आतिथ्याला कधी कोणी इथे रडेल काय ?

सगळा प्राण डोळ्यात आणून असं पाहिल्यावर,
माझं पाऊल जरासुद्धा पुढे पडेल काय ?

# कुठे  असतं ?

चकाकणारं सारं सुवर्ण कुठे असतं ?
रसिकाचं नातं जीर्ण कुठे असतं ?

रोज सामोरं जायचं,रोज परीक्षा द्यायची,
जीवनाचं कोडं, परिपूर्ण कुठे असतं ?

आपापल्या चितानी, पेटलेले सारे,
परदुःखा काळीज, विदीर्ण कुठे असतं ?

भराभरा दाहीदिशा, पांगलेले सारे,
सोसलेले झाड, सपर्ण कुठे असतं ?

दुःखे ही एकेकटी कधी रहात नाहीत,
पळसाला एकच पर्ण, कुठे असतं ?



निळ्याशार घुमटावर कबूतर बनून बसणंही
पसंत केलं असतं,
पण इथं आत जायला वाट नसते,
बाहेरच बसावं लागत, बेवारशा सारखं,
माणसांच्या नजरा पहात.
त्यात माणूसपण शोधीत.
कधि ते सापडलं की गुंतून जायला होतं,
पण प्रवाशानं असं गुंतून पडायचं नसतं.
जगायचं असतं, सफरचंदासारखं–खुशालचेंडू
टवटवीत–झाकोळून जायचं नसतं कधि.
स्वप्नही पडतात हल्ली अर्धवट–अस्वस्थ करणारी
कधी चंद्रकोरीची तर कधि चतकोरीची
अन् मग पहाटे कधि कानावर येतो आवाज बांगेंचा'
घंटानादासारखा
ये रे ये भलाईकडे ये
मनाच्या गाभाऱ्यातून आलेला
मनाच्या गाभाऱ्यात पोचणारा
माणसाचं माणूसपण जागं करणारा
ऋणानुबंध सांगणारा–ऋणानुबंध सांधणारा
प्रवासातल्या ओळखी–संबंध काही शाश्वत नसतं
प्रवासात कशाचाही लोभ धरायचा नसतो
हेच खरं......!



# आठवण...

या सायंकाळी रित्या मनाचा खेळ.
सुख-दु:खांच्या आठवणींचा मेळ.

दोघीत घडावा अबोलसा समझोता.
दु:खाची मागे जावी—पुढती होता.

स्वागता तुझ्या आतुर असावी दारे.
तालात झुलावे झुंबर हिन्दळणारे.

अन् जडावलेली थबकावी पावलें.
मग शमवावे मम वादळ मनींचे इवले.

तू गोंजारावे हलके हळवे डाग.
रूजल्या जखमांचे पुसले जावे माग.

जाऊच नये म्हणुनी तुजला विनवावे.
हलकेच स्वत:ला तू सोडवून घ्यावे.

मग हसूनी उडावा आठवणींचा रावा.
का कसा कळे, त्या माझ्या मनीचा कावा.

# सांग ना!



नयनी पहातो तुझीच मूर्ति,
हृदयातही तू येशील का ?

स्वप्नी जरी तू माझी असशी,
सत्यातही तू होशील का ?

प्रीती माझी तुजवरती गे,
तशीच तुझीही असेल का ?

हास्य तुझे–आनंद मला हे,
दृश्य सदोदित दिसेल का ?

वेडा मी तव प्रीतीसाठी,
तूही वेडी होशील का ?

प्रश्न वेडे–उत्तर वेडे,
तूही वेडाच म्हणशील का ?



# अभिसारीका

साडीची पानें, हिरवी-हिरवी
मुखाचं कमल, कोमेजलेलं ।
फुटलं डाळिंब, मोत्याचे दाणे.
ओठाचं सालट, सुकलेलं ॥

डोक्यात माळली, केवड्याची पात,
पाठीची नागीण, थकलेली ।
निळ्या डोळ्यांत, काजळाची रेघ,
डोळ्याची पात, लवलेली ॥

फुलल्या फुलाचं, सुकलेलं ओझं.
मानेचा देठ, झुकलेला ।
यौवनी आज, वसंत आहे,
बहर मात्र, सुकलेला ॥

आज अशी का, उदासवाणी,
दिसते आहेस, असं काय झालं ।
वाट पाहून, का आला नाही भृंग,
जाऊ दे ग मेला, भृंगच तो ! ॥



# मी का म्हणू व्यर्थ

तुला पाहूनी मी । चंद्रा हिणविले ।
फुलां वेडाविले । नकळत ॥
गुलाबी गुलाब । हाती कुस्करीले ।
मन ना रमले । तारकांत ॥

नक्षत्रांनी नाही । केली बरोबरी ।
सुगंधी कस्तूरी । फिकी वाटे ॥
आठवांचा सडा । रोज अंगणांत ।
स्मृतिचा सुगंध । उरी दाटे ॥

उपमा-उत्प्रेक्षा । उधळल्या स्वैर ।
जीवनाची खैर । नाही केली ॥
आभाळाहूनही । माया जास्त केली ।
कमी पडे खोली । सागराची ॥

परि सर्व झाली । व्यर्थ यातायात ।
हाती तुझा हात । नाही आला ॥
गेले ते, स्वर्गाला । राहिले मोक्षार्थ ।
मी का म्हणू व्यर्थ । जन्म सारा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

# कर्ते करविते



काही कर्ते असतात, काही करविण्यासाठी ।
राबणारे आम्ही अन्, ते राबविण्यासाठी ।।

सगळ्याच वाटांचा कधी, लागू नये माग ।
काही वाटा असतात फक्त हरविण्यासाठी ।।

साऱ्याच सभांना कधी, असू नये गर्दी ।
काही असतातच मुळी फक्त भरविण्यासाठी ।।

सगळेच बेत कधी, जाऊ नयेत सिद्धीस ।
काही बेत असतात, फक्त ठरविण्यासाठी ।।

सगळीच दुःखे कधी, संपूही नयेत ।
राहावीत त्यातली काही, मागे मिरविण्यासाठी ।।



# संकोच

हा तुझ्या-माझ्यातला संकोच आहे,
मी जसा होतो तसा अन् तोच आहे ।

आज ते आलेत दारी सांत्वनाला,
भाबड्या, चेहऱ्यावरीही बोच आहे ।

मोडला त्यांनी अबोला आज ऐसा,
कोरड्या शब्दात देखिल खोच आहे ।

जे बरे वाईट झाले आजवरती,
श्रेय घेण्या मजज त्यांची चोच आहे ।

वांझ विजयाचे करा जल्लोष तुम्ही,
ही कुणाच्या आहुतीची पोच आहे ।




नकळत जेव्हा क्षितीजापाशी आकाश ढळले,
नीरस नयना कधि नव्हेते ' मी पण ' कळले.

तोल सावरीत तारेवरती प्रवास सारा,
आसुसलेल्या तुझ्या मिठीचा सुटे किनारा.

चौफुल्यावर खुणावती मज अनेक वाटा,
वळणे–आडवळणेही बरी अन् पायी कांटा

पाय मातीचे आकाश कैसे कवेत घ्यावे,
क्षितीजापाशी कात टाकूनी रितेच व्हावे.

कशास कोणी द्यावी कोरडी सहानुभूति,
भालावर माझ्याच चितेची सजे विभूती.



# जनरीत

अशा वाहत्या वाऱ्याशी, काल कोण हे भांडले,
डोळां भरलेले पाणी, अचानक लवंडले.

कसा कुठूनसा असा, शब्द ओठावर आला,
सखे, तुझ्या तोंडावर, चांदणे गे ओसंडले.

किती वेगळाली रूपें तुझी साठवावी डोळां,
माझ्या मनाच्या आकाशी, जसे तारे की मांडिले.

ना अस्त्र–ना परत्न, असे निर्वेदी आयुष्य,
आकाराला येता येता, किती दिवस सांडले.

श्रद्धा असावी म्हणूनी, कुठेतरी ठेविली ती,
झाला तिचाच आधार, आता वय कलंडले.

प्रेम द्यावे–प्रेम घ्यावे, जगा शिकविले खरें,
आणि गळ्याचे ताईत, राखेसाठीही भांडले.



# पाऊस

कोसळतो पाऊस हा,
कोसळल्या सरीसरी ।
जसं मनाचं पाखरूं,
उतरलं भुईवरी ॥

कोसळतो पाऊस हा,
तम दाटला दाटला ।
कल्लोळ हा भावनांचा,
सुन्न होऊनी आटला ॥

कोसळतो पाऊस हा,
लय-ताल तो साधून ।
कोणी कुठल्या नात्याने,
मला ठेवले बांधून ॥

कोसळतो पाऊस हा,
ओले हळवेसे मन ।
आठवणीने कुणाच्या,
डोळे आलेत भरून ॥

कोसळतो कोसळतो,
कधी उन्हात पाऊस ।
तोही खोटाच निघावा,
पैसा दिलेला खाऊस ॥

# अंधार



क्षितिजाच्या कडेवर,
विसावली चंद्रकोर,
अंधाराचं भूत जरा.
डोके काढून आले वर ।

प्रकाश–प्रकाश ज्याला म्हटले,
तोही शेवटी प्रकाश नाही,
थकल्या-भागल्या प्रकाशाने,
अंधाराला म्हटले आई ।

पाप-पुण्य खरे म्हणजे,
दोघे सख्खे भाऊभाऊ,
एकमेकांच्या गळ्यांतगळे,
घालून आता लागतील राहू ।

श्लील-अश्लील तरी काय,
फक्त वादविवादा पुरते,
त्याही पलिकडचे असे,
सारे काही घडत असते ।

होऊन जाते, घडून जाते.
आणि मग उजाडते,
शिव्या देती नशिबाला,
कुणी आसवे ढाळते ।

रोज प्रकाश अंधार,
रोज अंधार प्रकाश,
रोजचीच आत्महत्त्या,
रोज जीवनाची आस ।

# रस्ते आणि रस्ते

खळग्यामधूनी रस्ता. दिसतो कसा प्रवाही ।
नतद्रष्ट कोणी वेडे, करतील कारवाई ॥

हा एक आड रस्ता. झोकांडतो कधीही ।
नाही म्हणोनी कोणी, येई पुन्हापुन्हाही ॥

तलम मखमली रस्ता, थांबा खुला न सर्वां ।
खाशा असामी जाती, कोण त्या तुम्ही ठरवा ॥

रस्ता म्हणू नका हो. मार्ग इथे झालेला ।
थेट सदाशिव पेठी, सभ्य गंध ल्यालेला ॥

हा मात्र राजरस्ता, खुडतो फुलें जीवांची ।
होऊन धन्य करीतो, ओळख जीवा-शिवांची

रस्ते भल्या-बुऱ्यांचे, कळले कुणाकुणाला ।
रस्ते कुठे न जाती, जाणे तुम्हां आम्हाला ॥



# उभी रेघ

एकच एक
उभी रेघ
या टोकापासून
त्या टोकापर्यन्त
धावणारी
सरळसोट
नाकापूढे पहात
मधली अपरिहार्य वळणे
ओलांडीत
धावणारी
काही ठिकाणी
भारदस्तपणे झुकलेली
तर कुठे असहायपणे
कोलमडू पहाणारी
अनंताचा प्रवास
एकाकी करणारी
जन्माच्या बिन्दूतून उगम पाऊन
मृत्यूच्या सीमेवर थांबणारी
एकच एक
उभी रेघ.



# विरही राधा

आज घडा राधेचा रिता, अश्रुंनी ती झाली चिंब ।
खळालल्या यमुनेच्या काठी. पाही निरखून अपुले बिंब ।।

कधि उधळले रंग प्रीतीचे. खेळ खेळलो रूसलोही ।
कधी नाचलो धुन्द होऊनी, तन-मन अर्पुनी पुजलेही ।।

आज निनादे कोठे पावा, हंबरती वेड्या गायी ।
दह्या-दूधाचे माठ रिकामे, विस्कटलेली आमराई ।।

आजवरी हे नव्हते घडले, काय अशी झाली बाधा ।
आळविते ती एक विराणी, गोकूळांत विरही राधा ।।

थरारते का सारी काया, डोहावरला कदंब होऊन ।
आणि वहाते जळ यमुनेचे, डोळ्यामधुनी अश्रु होऊन ।।



# उठाठेव

आवर्जून सांगावं तुला, असं काही घडलं नाही,
विज झेलणारं मन, मोडून तसं पडलं नाही.

स्वप्नांकांक्षा–आणाभाका, किती खरं किती खोटं,
तरीसुद्धा तुझ्याशिवाय, मन कुठं जडलं नाही.

चालू होता–राहिलही, तसा श्वास चालू आहे,
ही रीत तुझी तुला, मलाच काही परवडलं नाही.

चाचपडताना मलाच माझ्यात, काही पायाला लागलं,
मन होतं–ठोकरल्यावर, पुन्हा काही अडलं नाही.

पुन्हा वाळू आणायची, पुन्हा घर बांधायचं,
एव्हढी उठाठेव करायला, माझं काही नडलं नाही.




दारिद्र्याने घेणाऱ्याच्या मोठा होतसे देणारा ।
नकाराने घेणाऱ्याच्या होतो गरीब देणारा ॥

देणाऱ्याने असे द्यावे, दुजा हाता कळू नये ।
कुणापाशी राही काय ? नाव राखतो देणारा ॥

मजा घेत घेत जगा, मजा घेतच जगवा ।
सुख-दुःख आपली ना, घेई पाहून देणारा ॥

दिले-घेतल्याचे कधी, कुठे जन्माला पुरते ।
होई घेणाऱ्याला ओझे, सुखे मोकळा देणारा ॥

शब्द कुबेराचे धन, दोन्ही हातांनी लुटावे ।
शब्द शब्द घेणाऱ्याला, सुख आनंद देणारा ॥

# त्राता



जे शापिती तयांना, म्हणतात भाग्यदाता,
कळपातल्या जीवांचा, होईल कोण त्राता

खांद्यावरी उभे जे, आकाशी पोचलेले,
येताच स्वर्ग हाती, ते झाडतील लाथा

सत्ताधिशांसमोर, शेपुट घालती जे,
गल्लीत आपुल्या मग, ते मारतील बाता

दारात आज त्यांच्या, जयघोष असत्याचा,
फसतील भाबडे ते, विसरून राजरस्ता

तांडे समर्थकांचे, दारी झुलोत त्यांच्या,
लाचार गांडूळांचा, व्यापार तोही होता

जे वंदनीय होते, लाचार आज तेही,
अब्रू कुणाकुणाची, स्वस्तात विके आता.

# चांदण्याचा रंग ओला

का रूपेरी चांदण्याचा रंग ओला ।
चांदराती की कुणाचा स्पर्श ओला ॥

कंठला मी काळ विरहाचा म्हणोनी ।
प्रार्थना केली पडो दुष्काळ ओला ॥

तू असावी, तू दिसावी, तू हसावी ।
म्हणूनी केला नियतीचा मी हात ओला ॥

साहतो आहेच जगती मी उन्हाळा ।
राहीला कैसा अजूनी रंग ओला ॥

भटकले घनघोर तारू वादळी या ।
तारूनी नेईल तो स्वर स्वैर ओला ॥




आता कसली उत्तरे, आता कसली परीक्षा ।
आसुसल्या जीवनाची, आता संपली प्रतीक्षा ॥

तुम्ही-आम्ही सारखेच, दान मागतो दैवाला ।
मात्र माधुकरी तुमची, आणि माझी ठरे भिक्षा ॥

माणूसपण हरवलेले, इथे माणसांचे धर्म ।
सारे चोचले जगाचे, घेऊ कसली मी दीक्षा ॥

मधमाशांच्या हट्टाने, गोळा केले क्षण काही ।
थोडे गळाले-छिनले बाकी, कसली ही शिक्षा ॥

जगलो मी, जागलो मी, इथे प्रत्येक क्षणाला ।
करे परीक्षण कोणी, कोणी लिहितो समिक्षा ॥

ठेवायची तरी श्रद्धा, आता कुठे आणि कशी ।
हैवानाच्या तोंडीसुद्धा, इथे आता रामरक्षा ॥



# कैफीयत

किती भाविकांना तू दाविलीस वाट,
मला मात्र देवा, तू दाविलीस पाठ......॥ धृ ॥

अनुराग-लोभ-माया तुझी अनंत रुपें,
करूणा-दया-क्षमा ही मी पाहिली स्वरुपे,
जगणे, तुझा प्रसाद. श्रद्धा अशी ही दाट,
मला मात्र देवा, तू दाविलीस पाठ......॥ १ ॥

धरली न हाव केली कधी वेगळी तपस्या,
केला कधि ना रोष ना मांडीली समस्या,
मोदे स्विकारले मी जे वाढलेस ताट,
मला मात्र देवा, तू दाविलीस पाठ......॥ २ ॥

ही हाव जीवनाची माया प्रपंच सारा,
फसविच ही आसक्ती, फसवाच हा पसारा,
थकल्यावरी आताका, दिसू नयेत काठ,
मला मात्र देवा. तू दाविलीस पाठ......॥ ३ ॥

गात्री तुझेच श्वास, श्वासात नाम तुझे,
वृष्टी तुझ्या कृपेची व्हावी नकोच दूजे,
देवा तुझ्याच दारी, मी टेकले ललाट.
मला मात्र देवा तू दाविलीस पाठ......॥ ४ ॥




जगणे असो सुखावह, शांती असो मनाही,
निवृत्त माणसाला, दूजे नकोच काही.....।। धृ ।।

केले व्यतीत जीवन, ही एव्हढी शिदोरी.
जगलो असा जगण्याची, झाली कधी न चोरी
जाणारी पैलतीरा, ही वाट गोड व्हावी......।। १ ।।

सेवा घडो हाताने, साकार स्वप्न होई,
ठेवून मान ताठ, ना ऋण आज डोई,
कृतकृत्य आज वाटे, चिंता नसे उराही......।। २ ।।

धरली न वैभवाची, कधी आस फार मोठी,
बचतीवरील माझी, ढळली कधी न दृष्टी.
झिजलो तनामनाने, व्हावी आता कृपाही......।। ३ ।।

माया अशी मिळावी, संपू नये जिव्हाळा,
यावा वसंत म्हणूनी, मी साहीला उन्हाळा.
उठत्या तृणांकुराला, मातीची जाण रहावी......।। ४ ।।



# रे, वसंता

रे वसंता, मी तुला केली मनाई ।
का फिरूनी यायची केलीस घाई ॥

उडालेले रंग अन् काळोख भिंती ।
सावरायाचे तसे अजूनी मलाही ॥

वेचलेले मी तसे माझेच अश्रू ।
वाटले मोती कुणा, कधी,याद नाही ॥

टाकलेला मी कुठे निःश्वास अजूनी ।
भोग ते भोगायचे असतील काही ॥

तळहाताच्या गुंतले रेषांत भाग्य ।
कोण म्हणतो काय ते नावात नाही ॥

भोवतीच्या गर्दिला तोंडे किती ही ।
कोण ते काही म्हणाले, कोण काही ॥



# पाऊलवाट

या जीवघेण्या धुक्यांत
माझ्या प्रीतीची
हरवली आहे पाऊलवाट......
हे धुके दूर झाल्यावर
मी धावत येईन
पाखरा प्रमाणे......
घरट्याच्या ओढीने,
चातकाच्या आशेने,
तुझ्या चोचितल्या
चाऱ्याकरीता......
दऱ्याखोऱ्यातून,
कडेकपारीतून,
काट्याकुट्यांतून.
झेपावत......
एकच दिशा,
एकच एक पाऊलवाट
उराशी कवटाळून......
फक्त या पाऊलवाटेच्या
त्या टोकाला
माझी वाट पहा......
माझीच वाट पहा......



# प्रवासी

रंगल्या मैफिलीतील गीत ते गाजले,
जुन्या जखमेवर नवे डोस तू पाजले.

नांदब्रह्मातला मी रांगडा रंगणारा,
सूर विकणारे तुम्ही, मी तुम्हा त्याजिले

वाळवंटातला मी प्रवाशी गड्या,
काय सांगू कुणाला पाय का भाजले.

दोष देवू कुणाला ते तसे दूरचे,
सांग तूही कधी, काही नावाजले.

हे कीर्नि तू अशी ही, उपेक्षा का करावी,
साजले ना तुला हे, ना मला साजले.



# श्रध्दा

करा छोटयांचा आदर, आणिं मोठयापुढे झुका ।
इथे सारेच घडीचे, डौल दाऊ नये फुका ।।

बोल बोबडे ऐकता, सुपाएवढा हो जीव ।
कसे करूं, काय करूं किती करूं मी कौतुका ।।

श्रद्धा ठेविली, श्रद्धेने जीवा मिळाला दिलासा ।
तुझ्या छायेत सुखाने, जावा काळ ओला-सुका ।।

अशी नाती काही, करूं नमस्कार तरी कसा ।
आणि द्याया आशीर्वाद, नाही मोठा मी इतुका ।।

तुम्ही श्रद्धेच्या डोळयांनी, पहा घडलेल्या गोष्टी ।
मार्ग दिसेल अचूक, क्षम्य होतीलही चुका ।।

# चुका



व्हायचं असतं मोठं, करीत करीत चुका ।
मोठेपणी लहानांच्या, सावरायच्या चुका ।।

उगवणाऱ्या उद्यासाठी, पायात हवे बळ ।
चुकणाऱ्या पावलावर, ठोकू नका चुका ।।

चुकणे हा माणसाचा हक्क आणि धर्मच ।
पुन्हा पुन्हा त्याच त्याच करूं नका चुका ।।

वाढते त्यांची प्रतिष्ठा, वाढतो सन्मानही ।
धन्य त्यांचे गुन्हे अन्, धन्य त्यांच्या चुका ।।

असावी ललाटी एखादी, सुखाची ही रेषा ।
खचू नका तोही करतो, कधी कधी चुका ।।

गृहीत धरूं नका कुणा, क्षमाशील असा ।
दया लोभ ठऊन, द्याव्या घ्याव्या भूल-चुका ।।



# चिमणाजीव

चिमणीच्या दातानी तोडलं,
म्हणून उष्टावलं नाही.
नाहीतर कधीच,
उष्टावलं असतं......।

चिमणीच्या चोचिने प्यालो,
म्हणून सुख टिकलं.
नाहीतर कधीच.
टिकलं नसतं .....।

चिमणीच्या घरट्यांत राहीलो,
म्हणून उब गेली नाही.
नाहीतर कधीच,
गेली असती......।

चिमणीच्या नजरेने पाहीले,
म्हणून दया आली.
नाहीतर कधीच,
आली नसती......।

चिमणीच्या पायानी चाललो,
म्हणून थकलो नाही.
नाहीतर कधीच,
थकलो असतो......।

चिमणीच्या हाताने केले,
म्हणून आजवर टिकलो.
नाहीतरी कधीच,
टिकलो नसतो......।

एक चिमणी घरांत आहे,
चिमणा जीवही आला आहे.
मीही चिमणा झालो आहे,
नी चिमणीच्या जिण्याने जगतो आहे......।



# मुक्ति

फुलल्या कशा कळ्या या, गंधीत होई वारे,
ये जाग जाणिवांना, हा स्पर्श बोलका रे.

विसरायचे कसे ते, रूतले उरांत सारे,
टेकून ओठ टिपले, तू दुःख बोचणारे.

येताच तू भरावा, या मैफिलीत रंग,
संवेदना मुकी ही, काया कशी थरारे.

उपहास-उपेक्षांचे, विझले आता निखारे,
तू बांधलेस माझ्या, पदरांत चंद्र-तारे.

यावास तू सदाचा, जाऊ नये पुन्हा रे,
मी मुक्त मुक्त झाले, तुझ्यात गुंतुनी रे



# न्याय

उगवत्या सूर्यापुढे वाका म्हणाला,
काम अडता गर्दभां काका म्हणाला ।

कायद्याचे राज्य आहे मी म्हणालो,
काय द्यायचे देऊनी टाका म्हणाला ।

देवतेच्या ' न्याय ' हातींचे तराजू,
आंधळी ती, काहीही झोका म्हणाला ।

खाऊनी उंदीर शंभर जाई तीर्था,
मांजरीला पांढरा बोका म्हणाला ।

जो बळी तो कान पिळूनी कर्म साधी,
दम असेल तर येऊन टोका म्हणाला ।

# वेदना



दोन ओठी भार सगळा वेदनांचा
उघडता गणंगोत सगळे दूर झाले.

ठेविलेले मी उभे आयुष्य माझे
'तारणी' लिलाव ते बोलून गेले.

घेत मागोवा आलेले मागुनी
पाणपोई संपवूनी पुढती निघाले.

आसवांचा फुलवूनी हा ताटवा,
ते सुगंधी गंध लुटूनी चालले.

चालते चर्चा गुणांची–अवगूणांची
ह्यास तो साक्षी बनोनी चालले.

फोडतो टाहो, आशा मी उद्धरावा
हात कानीं दोन्ही ठेवूनी चालले.



# एकटा

काय सांगू भोगलेल्या त्या क्षणांच्या मी कथा ।
मोहुनी साऱ्या जगाला, एकटा मी एकटा ॥ धृ ॥

प्राक्तनी जे जे असावे, ना कधी म्हटलेच ना ।
रोजचे जे प्रश्न सारे, ते कधी सुटलेच ना ।
मी भिकारी. तू सदा दाता, तुझी ही संपदा ॥ १ ॥

वैभवाची का कुणी ईर्षा धरावी ना असा ।
हा मनोराही मनाचा, तो उभा राही कसा ।
धावलो मी मृगजळाच्या पार तेथे कैकदा ॥ २ ॥

तू दिले अन् घेतले मी, ते तसे अप्रूप ना ।
दु:खही माझे कधी मिरवून केले दिव्य ना ।
तू दिलेल्या जीवनाच्या पाहिल्या साऱ्या छटा ॥ ३ ॥



# भारत जोडो

युवाशक्तीचा, नव्या युगाचा, जथा चालला ।
भारत जोडो, भारत जोडो मंत्र आजला......।। धृ ।।

तमिळ, आंध्र, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्रही ।
धर्म, वंश. भाषांतीत शक्ती अन् विराटही ।
दक्षिण-उत्तर भारत सजला होकाराला ।
भारत जोडो, भारत जोडो मंत्र आजला......।। १ ।।

कठोर परिश्रम हाच एक पर्याय आम्हाला ।
एकटा नव्हे, एक-आतमता मार्ग आम्हाला ।
सजग, सुशिल नव समाज यावा आकाराला ।
भारत जोडो, भारत जोडो मंत्र आजला......।। २ ।।

आपलेपणा, न्याय, समता अन् स्वतंत्रता ।
पुर्ननिर्माणास्तव जी जागवी अस्मिता ।
भूमातेच्या रूजवा हिरव्या हुंकाराला ।
भारत जोडो, भारत जोडो मंत्र आजला......।। ३ ।।

मनामनाला सांधणारी ही हाक ऐका ।
बांध तोडूनी प्रवाहात या स्वतःस फेका ।
स्वप्न उद्याचे लखलखते घ्या आधाराला ।
भारत जोडो, भारत जोडो मंत्र आजला......।। ४ ।।

भारत जोडो अभियानाची नवी बांग ही ।
विस्तारत क्षितीजे तू मनाची, दुजा सांग ही ।
व्हा सहभागी ठेवूनी दूर दूराग्रहाला ।
भारत जोडो, भारत जोडो मंत्र आजला......।। ५ ।।

दुःख दुजाचे, पाणी माझ्या डोळा यावे ।
दुःखीतांच्या ओठावरले गाणे व्हावे ।
माणुसकीचा पाझर भिडवा आकाशाला ।
भारत जोडो, भारत जोडो मंत्र आजला......।। ६ ।।

REFBK-0025097
REFBK-0025097

# दूरस्थ



पुसटल्या वाटाही, दूर गेले गाव ।
कुणासाठी, कशासाठी, राखायाचे नाव ।।

मनासारखे आयुष्य मांडता न आले ।
पुन्हा सुरू करण्यासाठी मोडावा का डाव ।।

आयुष्याची फांदीही तुटुतुटू झाली ।
आपल्यांचे आणिक किती सोसायाचे घाव ।।

आकाशही वितीनेच मोजणारे तुम्ही ।
जाऊ द्या हो, असा कधी लागतो का ठाव ? ।।

इथे कसली किंमत कसली अपेक्षा ।
तुमचाच बाजार हा, तुमचेच भाव ।।



# कलंदर

मी हवेवर तरंगणारा,
घट्ट तुझे रूजलेले पाय ।
मी उन्मुक्त उनाडणारा,
तू प्यारी अल्लाची गाय ।।

मी शब्दावर जगणारा, तर
व्यवहाराचे तुजला भान ।
माणूसपण माझे हिरवे, तर
नातीगोती तुजला छान ।।

चार भिंतीत सुरक्षित तू,
वृत्ती माझी आकाशी ।
भरल्या संसारात तृप्त तू,
मी मुलखाचा अधाशी ।।

हसताना रडणारी तू, तर
रडताना हसणारा मी ।
सर्वदूर भरलेली तू, तर
कोठेंही नसणारा मी ।।

तुझ्यातले 'तूपण'ही माझे,
तुझ्यातले 'मीपण' माझे ।
मी कलंदर भणंग वारा,
काय पाहिले तू माझे ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
ग्रंथ शाखा (स्थळ

# ओंजळ

हा बहर फुले अवचित
गूढ हे खचित,
तरी हुरहूर
कोसळण्या आधी उरी
भरावा पूर ॥ १ ॥

ही चित्र दिव्यांची नक्षी.
आकाशी पक्षी
रेखिती दूर
जाणाऱ्यांपुढती असा
गवसला सूर ॥ २ ॥

हे काजळपाणी गहिरे
नयन बावरे
अशा एकांती
निसटता अनामिक
क्षणही यावा हाती ॥ ३ ॥

ही फुलें अडविती वाट
सुगंधी थाट
असा भावूक
ही नाती कसली काय
कुणा ठाऊक ॥ ४ ॥

जे सहज सांगता यावे.
मना समजावे
ही वळण किती
ओंजळीत भरली, ओंजळ
व्हावी रिती ॥ ५ ॥